**प्रेस नोट दि.०९/०६/२०१९**

**लष्कर पोलीस स्टेशन**

**अदला-बदल झालेल्या गाड्या तक्रारदार यांना परत केलेबाबत..**

दि.०७/०६/२०१९ रोजी पुलगेट मार्शलचे पोलीस कर्मचारी पो.हवा. २३८८ हिरालाल पिलाण व पो. शि. ९०२८ रामचंद्र तुपेयांना पोलीस नियंत्रण कक्षाकडुन कॉल प्राप्त झाला की, कॉलर नामे. बलराज गदरकर यांची गाडी चौरीला गेली आहे. त्यांना मदत पाहीजे आहे. असा कॉल प्राप्त झाल्यांनतर पुलगेट मार्शलचे वरील कर्मचारी यांनी सदर कॉलर यांचेशी संपर्क करून त्यांना भेटून माहीती घेतली असता त्यांची हिरो होन्डा कंपनीची फॅशन प्लस MH 12 FJ2314 गाडी चौरीला गेली आहे. त्यांचे गाडीचा आजूबाजूला शोध घेत असतांना त्यावेळी इसम नामे. मोबीन शेख सदर ठिकाण आले व त्यांचे गाडीची आदला बदल झाली असल्याचे त्यांनी सांगीतले. मोबी शेख यांची मो.सा. MH12.EP3736 ही गाडी घटनास्थळावर मिळुन आली. दोन्ही गाड्या दिसण्यास सारख्या असल्याने त्याची आदला बदल झाली होती. सदरबाबत खात्री करून व कागदपत्रांची पडताळणी करून दोन्ही गाड्यांचे मालक नामे बलराज गुदरकर व मोबीन शेख यांच्या ताब्यात दिलेल्या आहेत.

सदरची कामगीरी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत द. भोसले लष्कर पोलीस स्टेशन पुणे यांचे मार्गदर्शना खाली पुलगेट मार्शलचे पोलीस कर्मचारी पो.हवा.२३८८ हिरालाल पिलाण व पो.शि.९०२८ रामचंद्र तुपे यांनी केली आहे.

